# ग्रामपंचायत कार्यालय सितेपार
## पंचायत समिती तुमसर, जि. भंडारा

ई– टेंडर नोटिस क्र. १ ई–२०२६–२७

**<u>ग्रामपंचायत सितेपार विविध योजने अंतर्गत बांधकाम करिता साहित्य पुरवठा करणे बाबद.</u>**

ग्रामपंचायत सितेपार ला विविध प्रकारचे बांधकामासाठी लागणारे साहित्य पुरविण्याकरीता GST कायद्यान्वये पंजीकृत पुरवठा धारकांकडुन ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची प्रक्रीया संगणकावर प्रक्रीयेद्वारे ऑनलाईन करण्यात येईल. या निविदे संबंधित यापुढील सर्व सुचना / शुध्दीपत्रक ईत्यादी इंटरनेच्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येईल.

वरील निविदेबाबद संपुर्ण माहिती शासनाच्या www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २०/०५/२०२६ रोजी ९.०० वाजेपासून दिनांक २६/०५/२०२६ ला १५.०० वाजता पर्यत पाहता येईल व डाऊनलोड करणे व निविदा भरता येईल.

**<u>निविदा बाबद आवश्यक बाबी</u>**

१) निविदा विक्री १००/– व अग्रीम सुरक्षा अनामत रक्कम २००/– ग्रामपंचायत च्या नमुना सात पावती द्वारे भरून सदर पावती ऑनलाईन निविदे मध्ये कागदपत्र सहित अपलोड करावी.
२) सदर कामाच्या आवश्यक अटी व शर्ती तसेच निविदा दाखल करण्याचे वेळापत्रक इ. माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.
३) अ) सदर अटी व शर्ती नुसार नमुन केलेल्या कागदपत्रांच्या प्रती ई–निविदेत स्कॅन करून पी.डी.एफ (PDF) फॉर्म मध्ये सादर करणे आवश्यक आहे. व अपलोड केलेली सर्व कागदपत्र लिफाफा क्र. (१) मध्ये सादर करावे.
ब) सदर कागदपत्राची पुर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरविली जाईल.
४) लिफाफा क्र. १ मध्ये स्कॅन करून सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती कागदपत्रे स्कॅन करून लिफाफा क्र. १ ला एकत्र अपलोड करावे. तरच निविद स्विकारण्यात येईल.
५) उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
६) पुर्ण माहिती भरलेले तांत्रिक लिफाफा क्र.१ ऑनलाईन पध्दतीने दि. २७/०५/२०२६ रोजी ११.०० वाजता www.mahatender.gov.on या संकेत स्थळावर ग्रामपंचायत कार्यालय सितेपार येथे उघडल्या जातील.
७) कोणत्याही निविदा अंशत:अथवा पुर्णत: स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सरपंच व सचिव **सितेपार** यांनी राखुन ठेवण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| सरपंच | सचिव |
| ग्रामपंचायत सितेपार | ग्रामपंचायत सितेपार |

# ग्रामपंचायत कार्यालय सितेपार
# पंचायत समिती तुमसर जिल्हा भंडारा

**निविदेच्या अटी व शर्ती :—**

१) सदर निविदा ही ई—निविदा प्रक्रियेने करण्यात येणार असून त्यामधील दस्ताऐवज अपलोड करून स्कॅन कॉपी पध्दतीने सादर करण्यात यावी.

२) लिफाफा क्र. १ मध्ये निविदा सुचनेनुसार अपलोड केलेल्या अटी व शर्ती नुसार व स्कॅन कॉपी डाऊनलोड करून खालील प्रमाणे कागदपत्र जोडण्यात यावे.

अ) निविदा विक्री १००/— व अग्रीम सुरक्षा अनामत रक्कम २००/— ग्रामपंचायत च्या नमुना सात पावती द्वारे भरावी व ती स्लीप ऑनलाईन निविदे मध्ये कागदपत्र सहित अपलोड करावी.

ब) GST कायद्यान्वये पंजीकृत प्रमाणपत्राची प्रत (अद्यावत /नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र अनिवार्य आहे.)

क) प्राप्तीकर मागील तीन वर्षा पर्यत भरल्याबाबद प्रमाणपत्र / दाखला जोडण्यात यावा.

ड) निविदा धारकाचे नाव शासनाच्या कोणत्याही विभागा मार्फत काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबद सक्षम प्राधिकरणाकडून सांक्षाकिंत केलेला प्रतिज्ञालेख (Affidavit).

इ) निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे पुरवठा धारकाच्या सही व शिक्यानिशी या अर्जासोबत असलेली मुळ प्रत.

फ) तांत्रिक लिफाफा यामध्ये सादर करावयाच्या आवश्यक कागद पत्रासोबत आयकर, भरल्या संबंधी किंवा त्यातुन सूट मिळाल्या संबंधी सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.

भ) सादर केलेल्या लिफाफा यामधील तांत्रिक लिफाफा यामध्ये (क्र.१) नमुद केलेल्या आवश्यक अटीपैकी एकही बाब अपुर्ण असल्यास लिफाफा क्र. २ उघडल्या जाणार नाही.

३) पुरविण्यात येणाऱ्या सर्व साहित्याची रॉयल्टी, विक्रीकर, आयकर, व शासनाने ईतर उपकर व फी भरण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील. व यातील कोणत्याही नियमाचा भंग झाल्यास दंड वा शिक्षेस पुरवठा धारक स्वत: जवाबदार राहील.

४) लिफाफा क्र. २ मध्ये सर्व साहित्याचे दर भरणे बंधनकारक राहील त्या शिवाय निविदा मंजूर करण्यात येणार नाही.

५) ऑनलाईन मध्ये जोडलेले आवश्यक कागदपत्रे व निविदेमध्ये नमुन केलेले दर यांचे मुल्यमापण करून निविदा स्विकृतीचे किंवा कोणतेही करण न देता फेटाळण्याचे सर्व अधिकार सरपंच/ग्रामसेवक ग्रा.प. **सितेपार** यांना राखीव आहेत.

६) साहित्याची मागणी केल्यापासून तीन दिवसाच्या आत साहीत्य पुरवठा ग्रामपंचायत कार्यालय येथे किंवा ग्रामपंचायत ने सुचविलेल्या बांधकाम स्थळी करावा लागेल अन्यथा अनामत रक्कम जप्त करून निविदा रद्द केली जाईल.

७) लिफाफा क्र.२ मध्ये पुरवठा धारकाने स्वत:साठी खरेदी केलेल्या निविदा अर्जात (प्राईस टेंडर फार्म) पुरवठा करावयाचे साहीत्याचे सर्व करासहीत निविदेत दर्शविल्या प्रमाणे एकत्रीकरण दर दर्शविणे आवश्यक असून पुरवठा धारकाने ता अपलोड करावा.

८) www.mahatender.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड केलेल्या निविदा फार्मवरच निविदा सादर कणे आवश्यक आहे. तसेच बिना स्वाक्षरी असलेली निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

९) लिफाफा क्र.१ मध्ये जोडलेले आवश्यक कागदपत्रे व निविदामध्ये नमुन केलेले दर यांचे मुल्यमापण करून निविदा स्विकृतीचे किंवा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे सर्व अधिकार सरपंच/सचिव ग्रा.पं. **सितेपार** यांना राखीव आहे.

१०) मंजुर निविदेतील साहित्याचे दर ३१/०३/२०२५ पर्यत लागु राहतील.

११) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

१२) निविदा मंजुर झालेल्या पुरवठा धारकाला ओदशपत्र देण्यापुर्वी रू १००/— च्या स्टॅम्पपेरवर विहीत नमुण्यात करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

१३) पुरवठा धारकास पुरविलेल्या साहित्याचे देयके निधीचे उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील. मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही. कामाची रक्कम मिळाल्यानंतरच साहित्याची देयके देण्यात येतील.

१४) सशर्त निविदा अस्वीकृतीस पात्र ठरतील व निविदेतील सर्व अटी व शर्ती पुरवठा धारकास बंधनकारक राहतील.

१५) गिट्टी, मुरूम, रेती, व दगड GST (शासनाच्या सुधारित दर प्रमाणे) इ. साहित्याची रॉयल्टी शासनाकडे जमा करण्याची जबाबदारी पुरवठा धारकाकडे राहील.

१६) पुरवठा केलेले साहित्य तांत्रिक दृष्ट्या योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचचेले असून त्या मला पुर्णपणे मान्य आहेत. उपरोक्त अटी व शर्ती नुसार सर्व कागदपत्रे बरोबर असल्यास मला पात्र करण्यात यावे. तसेच नमुद कागदपत्रापैकी एक सुध्दा कागदपत्राची पुर्तता न झाल्यास माझी निविदा फेटाळण्यास माझी काही हरकत नाही. करिता मी पुरवठा धारक या नात्याने स्वाक्षरी करीत आहे.

**निविदा धारकाची डिजीटल स्वाक्षरी**

स्वाक्षरी
सरपंच
ग्रामपंचायत सितेपार

स्वाक्षरी
सचिव
ग्रामपंचायत सितेपार

Signature Not Verified

Digitally signed by KESHISUDAN HOLURAM BARHEWAR
Date: 2026.05.19 20:53:15 IST
Location: Maharashtra-MH